# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल केलेली तक्रार**

## क्र.मुमाआ/नों.क्र.१०६६ /२५ /त.क्र.१४५ /२५/०१

श्रीमती विद्या दत्ताराम गांवकर.
एम.एच.बी.कॉलनी, १२/११६, एकता नगर, न्यू लिंक रोड,
महावीर नगर जवळ, कांदिवली (प), मुंबई-४०००६७.

**विरुद्ध**

जन माहिती अधिकारी तथा विभाग निरीक्षक (शाळा)
बृहन्मुंबई महानगरपालिका-शिक्षण विभाग, उपशिक्षणाधिकारी (खाप्रशा)
कार्यालय त्रिवेणी संगम म. न. पा. शालेय इमारत, ४ था मजला,
महादेवपालव मार्ग, कररोड (पू.)मुंबई-४०००१२.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक (खा.प्रा.शा.)
बृहन्मुंबई महानगरपालिका-शिक्षण विभाग, उपशिक्षणाधिकारी (खाप्रशा)
कार्यालय त्रिवेणी संगम म. न. पा. शालेय इमारत, ४ था मजला,
महादेवपालव मार्ग, कररोड (पू.)मुंबई-४०००१२.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १६.१२.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार श्रीमती विद्या गावकर यांनी यांच्या मूळ जोडपत्रानुसार श्री ज्ञानेश्वर विद्या मंदिर कांदिवली (पश्चिम) या शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती श्रद्धा शिंदे (प्राथमिक विभाग) यांना ऑक्टोबर २०१२ ते ऑक्टोबर २०१८ या कालावधीची थकबाकी देण्याकरता प्रशिक्षण अधिकारी (खाजगी प्राथमिक शाळा) यांच्या कार्यालयात स्वीकारण्यात आलेल्या थकबाकी प्रस्तावाच्या नस्तीला जोडलेल्या कागदपत्रासह सविस्तर माहिती/ छायांकित कागदपत्रांची मागणी केली होती यात तत्कालीन अपिलिय अधिकाऱ्यांनी कागदपत्रांचा शोध घ्यावा तसेच कागदपत्रांचा ताळमेळ घालून अपिलार्थींना पंधरा दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचा निर्देश दिले होते. यावर अपिलार्थींना मिळालेली माहिती ही अपूर्ण व चुकीची असून त्यावर दिनांक १७/०३/२०२२ रोजी मागणी करण्यात आलेला हजेरीपट संबंधित शाळेकडून प्राप्त करण्यात यावा व अपीलार्थींना पंधरा दिवसात निशुल्क देण्याचे निर्देश दिले होते. तथापि, अपिलार्थींच्या मूळ जोडपत्र **अ** नुसार मागितलेली माहिती, अपिलिय अधिकाऱ्यांनी पारित केलेला आदेश व अंतिम आदेश यात एकमेकांशी ताळमेळ नसल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते. तथापि, तत्कालीन माननीय आयुक्त यांनी अपीलार्थींचे अपील मान्य केले असल्याची वस्तुस्थिती लक्षात

घेत त्यांचे मूळ जोडपत्र **अ** प्रमाणे मागितलेली माहिती म्हणजेच श्री ज्ञानेश्वर विद्या मंदिर, कांदिवली (पश्चिम) या शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती श्रद्धा शिंदे (प्राथमिक विभाग) यांना ऑक्टोबर २०१२ ते ऑक्टोबर २०१८ या कालावधीची थकबाकी देण्याकरता प्रशिक्षण अधिकारी (खाजगी प्राथमिक शाळा) यांच्या कार्यालयात स्वीकारण्यात आलेल्या थकबाकी प्रस्तावाच्या नस्तीला जोडलेल्या कागदपत्रासह सविस्तर माहिती/ छायांकित कागदपत्रांची कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली व तक्रारदार यांच्या दिनांक २५/०७/२०१९ रोजीच्या मूळ जोडपत्रांमध्ये नमूद असलेल्या विषयाशी संबंधित नस्तीची संपूर्ण छायांकित व साक्षांकित प्रत विनामूल्य देण्याचे निर्देश देण्यात येत असून यासंदर्भात तक्रारदार यांनी मूळ नस्ती गहाळ झाली असल्याची तक्रार केली असून ही बाब अतिशय गंभीर आहे व यावर मूळ नस्ती गहाळ झाली असल्यास महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ यातील **कलम ६** प्रमाणे जबाबदारी निश्चित करून **कलम ९** प्रमाणे प्रशासकीय व आवश्यकता वाटल्यास फौजदारी कार्यवाही करण्यात यावी व **त्याचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.** वरील सर्व कार्यवाही **हा आदेश प्राप्त झाल्याचे दोन आठवड्यात करण्यात यावी.**

**आदेश**

**१.वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२.वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

( राहुल भा. पांडे )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १६.१२.२०२५**

State Information Commission ★ Maharashtra